2018.

# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

Volume V, Issue V | ISSN : 2350-0476 (Online) 2394-207X (Print) | May 2018
IMPACT FACTOR : 4.205

A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

ijmms

Cosmos

Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

www.ijmms.in | Email : ijmms14@gmail.com

VOLUME-V, ISSUE-V ISSN (Online): 2350-0476 ISSN (Print): 2394-207X
IMPACT FACTOR: 4.205
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

# Index


| Sr. | Name of the Paper | Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | Conversational Commerce: An Evolving Frontier in Expediency | Dr.Bagirathi Iyer | 1-6 |
| 2. | Possessions of Demonetisation on Indian Economy | Dr. Vinod H. Mane | 7-11 |
| 3. | Study and Analysis of Expected Competencies for foundation level management graduates (Management Trainee) in current business scenario | Prof. Rupesh Andhrutkar | 12-20 |
| 4. | Impact of Soft skills training program on Team performance – to be measured through Kirkpatrick model with special reference to the Organization – IBM India Pvt. Ltd. India | [1]Prof. Rupesh Andhrutkar<br>[2]Mrs. Minal Andhrutkar | 21-35 |
| 5. | Education and Sustainable Development- A Case Study on Indian Perspective | Prof. Manmohan Vyas | 36-39 |
| 6. | Digital India: Vision and Issues | Dr. Devendra G. Bhave | 40-44 |
| 7. | Integrated Marketing Communication (IMC) and its Impact on Working Women | Ms. Simran A. Chawla | 45-51 |
| 8. | An Evaluation of National Rural Health Mission (NRHM) in Osmanabad District-2005-2015 | Mr.Sasturkar Santosh Limbaraj | 52-57 |
| 9. | A Review of Inclusion through Vocational Education in India | Mr . Maruti Ishwara Kumbhar | 58-68 |
| 10. | Impact of Inventory Holding Period and Competence of Storekeepers on the Profit Level of a Firm: A Study of JSPL | [1]Rutuparna Dash<br>[2]Dr.Gayadhar Parhi | 69-87 |
| 11. | American Drama: An Introduction | Dr. Rajashekhar M. Yarbagi | 88-90 |
| 12. | Sigmund Freud and Feminism | Ms. Manisha Kale | 91-94 |
| 13. | Impact of Watching English Movies on English Language Proficiency of the $10^{th}$ Grade Students of CBSE and Maharashtra State Board | Mr. Deepak Subhash Dixit | 95-105 |
| 14. | पुण्यातील कचरा कर्मचारी आणि त्यांच्या अडचणी | दिपाली दत्तात्रय खोडदे | 106-112 |
| 15. | जीएसटी : एक देश एक कर | प्रा. बी. बी. भापकर | 113-116 |
| 16. | शाश्वत शेतीचे भवितव्य | सौ. शैला आनंदराव ढवळे | 117-120 |




Khodade

# पुण्यातील कचरा कर्मचारी आणि त्यांच्या अडचणी

**दिपाली दत्तात्रय खोडदे**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी

**प्रस्तावना :** आज आपण बघतच आहोत की दिवसेंदिवस कचऱ्याच्या समस्या ह्या पुणेकरांना अतिशय भेडसावत आहेत. व्यवस्थित कचरा उचलला न गेल्यामुळे कचरा साठवून राहतो त्यामुळे रस्त्यावर घाण दिसते तसेच रस्त्यावरील प्राणी त्यांच्यावर परत घाण करून त्याला पसरवतात. ओल्या आणि घनकचरा यामुळे तेथील जवळची हवा पाणी आणि जमीन ही घाण होते. तसेच विविध प्रकारचे रोगही पसरतात त्यामुळे डायरिया , हिवताप, मलेरिया अशा प्रकारचे रोग होतात.

त्यामुळे प्रत्येक जण त्या कचऱ्याच्या नावाने आणि पर्यायी त्या कचरा उचलणाऱ्याच्या नावाने ओरडत असतो. पण आपण मात्र कचरा उचलणाऱ्या कामगारांच्या अडचणी लक्षात घेत नाही. कचरा उचलणारा कर्मचारी हा सरकारी किंवा खाजगी कंपनीशी निगडित असतात. "कमी पैसे, कमी कामगार" त्याच्यामुळे कमी कामगारांवर कामाचे जास्त ओझे पडते तसेच नगरपालिकेकडे किंवा खाजगी कंपन्यांकडे कचरा उचलणारे अवजार, घंटा गाड्या तसेच सामाजिक कचराकुंडीची फार कमी असते. लोक ओला कचरा आणि घनकचरा वेगळा न करता कचरा तसाच कचराकुंडीत टाकतात त्यामुळे कचरा उचलणारयाला त्याचा फार त्रास होतो काही महिला तर मासिक धर्माचे कापडही तसेच टाकतात त्यामुळे त्याचे विघटन करण्यास कामगारांना फार त्रास होतो. घनकचरा आणि ओला कचरा एकत्र असल्यामुळे रिसायकलिंगला जाणाऱ्या घन कचऱ्याची किंमत कमी होते. त्याचे व्यवस्थित वर्गीकरण न झाल्यामुळे घनकचरा रिसायकलिंगला जाऊ शकत नाही तर ओला कचरा हा बायोगॅस किंवा खत तयार करण्यासाठी पाठवता येत नाही. या कचऱ्याला पुरायचे म्हटले तर जागाही नाही ज्या गावाकडे जाऊन कचरा पुरायचा असेल ते गावही कचरा पुरण्यासाठी परवानगी देत नाहीत या सर्व परिस्थितीत कचरा कामगारांची फार कोंडी होते. तर दुसरी कडे या कचरा कामगारांच्या तब्येतीची कंपन्यां कडून काळजी घेतल्या जात नाही. खाजगी कंपन्यांकडून त्यांना हात मोजे, पायातले लांब बूट, त्यांचे आरोग्य विमा तसेच दवाखान्याची सोय ही कंपन्यांकडून किंवा सरकारकडून व्हायला पाहिजे तसेच त्यांना कचरा उचलण्याचे योग्य ते शिक्षण आणि प्रशिक्षण देणे ही आवश्यक आहे. तसेच नागरिकांनी त्यांची हेडसान करतात त्यांना आदराने वागवले पाहिजे . नागरिकांनी ही ओला कचरा आणि कोरडा कचरा हा वेगळा करून टाकावा. प्लास्टिकच्या पिशव्या नागरिकांनी वापरू नये अशा प्रकारे आपण कचरा कामगारांना आपले कर्तव्य करून मदत करू शकतो.

**साहित्यिक पुनरावलोकन**

1)गाविकर आणि देशपांडे (2006) त्यांच्या अभ्यासानुसार नगरपालिका आणि काही प्रायव्हेट एजन्सिज शहरातल्या विविध ठिकाणचा कचरा जमा करून स्वच्छता सुविधा प्रदान करण्याचा प्रयत्न करतात तसेच सार्वजनिक आरोग्याचे संरक्षणही करतात परंतु कचरा परिवहन प्रक्रियेसाठी लागणाऱ्या गाड्यांचा अंदाज हा जोपर्यंत प्रति देवस कचरा किती उत्पन्न होतो याचा अचूक अंदाज जोपर्यंत येत नाही तोपर्यंत घनकचरा व्यवस्थापन संस्थेचा योग्य नियोजन होणार नाही असे त्यांनी त्यांच्या अभ्यासातून सुचवलेले आहे .

**2) झियादात, ए. एच. आणिहेन्रीएम. (2005): बंद परिसरांसाठी सॉलिड वेस्टरीसायकलिंग संधींचे मूल्यांकन करणे. पर्यावरण गुणवत्ताचे व्यवस्थापन.**

त्यांच्या अभ्यासात घनकचरा रिसायकलिंग अभ्यास केलेला आहे. रिसायकलिंग मध्ये घनकचऱ्याची विल्हेवाट आणि त्याचे व्यवस्थापन हे दोन्हीही चांगल्या प्रकारे केले पाहिजे. शहरी वातावरणात घनकचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी हे घनकचऱ्याचे व्यवस्थापन अतिशय आवश्यक आहे परंतु हे तेव्हाच साध्य होईल जावेळला नगरपालिका आर्थिक दृष्ट्या समक्ष असेल. तसाच कचरा व्यवस्थापन आणि चांगल्या प्रकारे प्रचार करून व्यवस्थित व्यवस्थापन करेल. या ठिकाणी कचरा वेगळा करणे अतिशय आवश्यक आहे. त्यात ओला कचरा हा वेगळ्या प्रकारे आणि घनकचरा हा वेगळ्या प्रकारे एकत्रित केला पाहिजे तरच चांगल्या प्रकारचा घनकचरा हा रिसायकलिंग साठी जाऊ शकतो यासाठी जनसामान्य लोकांना कचऱ्याचे पृथक्करण कशाप्रकारे होते हे व्यवस्थित समजून सांगता आले पाहिजे .यासाठी सरकारने लोकांना प्रोत्साहित करायला पाहिजे तसेच काही कायदे ही बनवायला हवेत,असे त्यांनी त्यांच्या अभ्यासात सांगितलेले आहे.

## संशोधन पद्धतीचा आराखडा

या संशोधनामध्ये कामगारांपर्यंत पोहोचून कामगारांना काही प्रश्न विचारण्यात आले होते. त्यानंतर समस्या समजून घेऊन त्याचा एक निष्कर्ष काढला या पद्धती प्रश्नावली आणि बायोग्राफी याचा उपयोग करण्यात आलेला आहे. यात ३७० कचरा उचलणारा कामगारांनाही प्रश्न विचारण्यात आलेली आहेत.


१) **कालबाह्य उपकरणे आणि वाहने**

तक्ता क्रमांक १ : **कालबाह्य उपकरणे आणि वाहने**

| **कालबाह्य उपकरणे आणि वाहने** | **सहमत** | **असहमत** | **तटस्थ** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| **महानगरपालिका कामगार** | २७० | ७९ | २१ | ३७० |
| **टक्के** | ७३.० | २१.३ | ५.७ | १०० |

आधार: संकलीत प्राथमिक माहितीच्या आधारे

आलेख क्रमांक १




आधार :तक्ता क्रमांक १


२) कचरा उचलल्यामुळे आरोग्यावर परिणाम

तक्ता क्रमांक २: कचरा उचलल्यामुळे आरोग्यावर परिणाम

| कचरा उचलल्यामुळे आरोग्यावर परिणाम | सहमत | असहमत | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|
| महानगरपालिका कामगार | २६७ | ८६ | १७ | ३७० |
| टक्के | ७२.१ | २३.२ | ४.३ | १०० |

आधार: संकलीत प्राथमिक माहितीच्या आधारे

आलेख क्रमांक २




आधार : तक्ता क्रमांक २

VOLUME-V, ISSUE-V ISSN (Online): 2350-0476 ISSN (Print): 2394-207X
IMPACT FACTOR: 4.205
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES


३) **नियोजन आणि अंमलबजावणीची कमतरता**

तक्ता क्रमांक ३: **नियोजन आणि अंमलबजावणीची कमतरता**

| नियोजन आणि अंमलबजावणीची कमतरता | सहमत | असहमत | माहित नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| महानगरपालिका कामगार | २५६ | ८० | ३४ | ३७० |
| टक्के | ६९.१ | २१.६ | ९.३ | १०० |

आधार: संकलीत प्राथमिक माहितीच्या आधारे

आलेख क्रमांक ३




आधार : तक्ता क्रमांक ३


४ ) **महानगरपालिका किंवा कचरा व्यवस्थापनाच्या खाजगी कंपन्यांकडून आरोग्य विमा किंवा मोफत इलाज कमतरता**

तक्ता क्रमांक ४: **महानगरपालिका किंवा कचरा व्यवस्थापनाच्या खाजगी कंपन्यांकडून आरोग्य विमा किंवा मोफत इलाज कमतरता**


| महानगरपालिका किंवा कचरा व्यवस्थापनाच्या खाजगी कंपन्यांकडून आरोग्य विमा किंवा मोफत इलाज कमतरता | सहमत | असहमत | माहित नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| महानगरपालिका कामगार | ३०९ | ३९ | २२ | ३७० |
| टक्के | ८३.५ | १०.५ | ६.० | १०० |

आधार: संकलीत प्राथमिक माहितीच्या आधारे





आलेख क्रमांक ४




आधार : तक्ता क्रमांक ४


५) **सार्वजनिक जागरूकता कमी**

तक्ता क्रमांक ५: **सार्वजनि जागरूकता कमी**

| सार्वजनिक जागरूकता कमी | सहमत | असहमत | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|
| महानगरपालिका कामगार | ३२२ | २७ | २१ | ३७० |
| टक्के | ८७.० | ७.३ | ५.७ | १०० |


आधार: संकलीत प्राथमिक माहितीच्या आधारे

आलेख क्रमांक ५




आधार :तक्ता क्रमांक ५





निष्कर्ष: वरील माहितीवरून असे दिसून येते की नगरपालिकेकडे तसेच कचरा उचलणाऱ्या खासगी कंपन्यांकडे कालबाह्य उपकरणे तसेच वाहने आहेत . कचऱ्याच्या सान्निध्यात नेहमी राहिल्यामुळे तसेच कचरा उचलल्यामुळे कचरा उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत असतो. आज नागरिकांना घनकचरा आणि ओला कचरा वेगवेगळा करण्याचे प्रशिक्षण द्यायला पाहिजे तसेच सरकारने काही नियम बांधून द्यायला हवेत. सामान्य नागरिकांनीही कचऱ्याचे नियोजन तसेच सरकारने बांधून दिलेल्या नियमाची अंमलबजावणी करायला हवी. सरकारने सांगितलेल्या नियमांची आपल्याला फार कमतरता दिसत आहे. कचरा कर्मचाऱ्यांचा कचऱ्याची सरळ संबंध येत असल्यामुळे त्यांच्या तब्येतीला किंवा आरोग्याला फार धोका असतो त्यामुळे महानगरपालिकेने किंवा कचरा व्यवस्थापनाच्या खाजगी कंपन्यांनी कचरा उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आरोग्य विमा उतरवायला हवा तसेच त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी ही करायला हवी. सरकारने वेगवेगळे प्रशिक्षण देऊन नागरिकांमध्ये कचरा व्यवस्थापनबद्दल आणि सार्वजनिक जागृती निर्माण करायला हवी.

## ग्रंथसूची


१) **Sharholy.M, 2008. भारतीय शहरात नगरपालिका घनकचरा व्यवस्थापन- एक पुनरावलोकन. वेस्ट व्यवस्थापन. 28: 45 9 -67.**शारोलीएटअल (2008)

२) **A study on the characterization and management of solid wastes in Guwahati city. Name of the journal: Ecology, Environment and Conservation (Accepted for publication in 2006, issue No.** उत्पल गोस्वामी आणि शर्मा (2006)

३) **भिडे, एडी, (1994),'सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटइन शहरी एरिया', नगर लोक, व्हॉल. 26, भारत**

४) **तमिलनाडु, भारत मधील सलेम सिटी मधील महानगरपालिकेच्या ठोस कचऱ्याच्या अयोग्य विल्हेवाटवर पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन, * सिव्हिल इंजिनिअरिंग, थियागज जर पॉलीचे प्रमुख. कॉलेज, सलेम, इंडिया. ** अध्यक्ष, रंगनाथन अभियांत्रिकी महाविद्यालय, कोयंबटूर, भारत.**कार्तिकेयन आणि मुरुगेसन (2007)

५) **गोस्वामी, उत्पल आणि शर्मा, एचपी (2008): गुवाहाटी शहरातील मृदा गुणवत्तावर महापालिका सॉलिड वेस्ट डंपिंगच्या प्रभावाचा अभ्यास**

६) **) अँजेलो, आर. आणि राणा वना, ए 1996: "मंदगतीने मृत्यू भारत पश्चिम टोक्सिकॉस्टसाठी डंपिंग ग्राउंड बनला आहे. आशियाचाआठवडा 1996**

७) **असनानी, पी. यू.(2006). 'सॉलिडवेस्ट मॅनेजमेंट'.ए. रास्तोगी (एड.) इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर रिपोर्ट 2006. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेस.**

८) **सोयेझके., थरणडी., हर्मनटी., कोल्लेरएम.,प्लाकर्र्टएस. बीएमबी एफ प्रकल्पाचे परिणाम**

९) **मॅकेनिकल-बायो लॉजिकल वेस्टट्रीट मेंट, मुआएलएफजी.**




Khodade

१०) दीवान जे.एम. आणि के.एन. सुदर्शन (2006), सॉलिड वेस्टमॅनेजमेंट, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस, ग्लोबल इकॉनॉमी जर्नल,

११) लेवे, डी. (2007): महापालिकेतील घनकचरा रिसायकलिंग आर्थिक दृष्ट्या पर्यावरण व्यवस्थापनासाठी कार्यक्षम आहे का

१२) दर्शनीमहादेविया, ए. पी. (2006, फेब्रुवारी). केंद्रीकृत आणि विकेंद्रित सॉलिड वेस्ट बंगलोर मध्ये व्यवस्थापन पद्धती कामकाजाचा पेपर. अहमदाबाद, गुजरात: स्कूल ऑफ प्लॅनिंग, सेप्ट, अहमदाबाद.

१३) मालगावेली, व्ही आणि पटुरू, एन.आर. (2011) कंक्रीटची सामर्थ्य वैशिष्ट्ये सॉलिड वेस्ट – एक प्रायोगिक तपासणी वापरून, आंतरराष्ट्रीय जर्नल ऑफ भूगर्भ विज्ञान व अभियांत्रिकी.

१४) विकसनशील देशांमध्ये नगरपालिका घनकचरा कायम स्वरूपी पुनर्नवीनी करण , लेखक दुवे ओव्हरले पॅनल ॲलेक्सिसएम. ट्रॉस्चिने टझेजजेम्स आर . मिहेलसीस

१५) डिटेक्शन अँड वॉटर क्वालिटी महत्त्व ?, सरडीनिया 19931 व्ही आंतरराष्ट्रीय लँडफिल सिंपोसियम. मार्गरिताडी पुला, इटली.